Volume : 1 | Issue : 3 | March 2012 ISSN - 2250-1991

Research Paper Economics

# 1 वसंतराव नाईक यांचे सामाजिक क्षेत्रातील योगदान

* Dr. Ashok Pawar ** Mr. Atmaram mulik ***Dr. Sunita Rathod

*,**,*** Department of Economics, Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University Aurangabad

**ABSTRACT**

महाराष्ट्र ही समाज सुधारकांची भूमी आहे. महाराष्ट्रात अनेक समाजसुधारक जन्माला आले त्यापैकी महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याने प्रभावित झालेले वसंतराव नाईक हे एक होत. त्यांनी राजकीय क्षेत्रात खूप मोठी यशोगाथा मिळवली ती समाजकार्यात स्वतःला वाहून घेतल्यामुळेच त्यांच्या सामाजिक कार्याकडे दूर्लक्ष करुन चालणार नाही. वसंतराव नाईक यांचे राजकारण हे सुरुवातीचे क्षेत्र नव्हते. त्यांनी आपल्या सामाजिक कार्याला सुरुवात केली. ती समाजसेवेने समाजसेवेचे महत्त्व त्यांना राजकारणापेक्षा कधीच कमी वाटत नव्हते. त्यामुळे वसंतराव नाईक यांचा राजकीय कारकीर्दीत देखील सामाजिक कार्याकडे ओढा दिसून येतो. वसंतराव नाईक यांचा जन्म मागासलेल्या बंजारा समाजामध्ये झाला. बंजारा समाजामध्ये असणाऱ्या जुन्या परंपरा, चालीरीती, अनिष्ठ रुढी तसेच विशिष्ट प्रकारचा पेहराव यात बदल घडवून आणण्यासाठी वसंतरावांनी स्वतः पुढाकार घेऊन समाजकार्याला प्रारंभ केला. त्याकरिता त्यांनी सामाजिक चळवळ उभारली. त्यामुळे त्यांना अनेकांनी विरोध ही केला, पण ''माझ्या आईपेक्षाही मला माझा समाज अधिक प्रिय आहे.''1 अशा तऱ्हेची भूमिका सातत्याने मांडून त्यांनी आपल्या विरोधकांचा बिमोड केला. यामधून त्यांचे समाजाविषयीचे प्रेम दिसून येते. हे लक्षात घेऊन वसंतराव नाईक यांचे सामाजिक क्षेत्रातील योगदान अभ्यासण्याच्या उद्देशाने ''वसंतराव नाईक यांचे सामाजिक क्षेत्रातील योगदान'' हा विषय प्रस्तुत शोधनिबंधासाठी निवडला आहे.

प्रस्तुत शोध निबंध हा प्रामुख्याने दुय्यम साधनसामुग्रीवर आधारीत आहे. वसंतराव नाईक यांना समाज कार्याची शिकवण वडिलांकडून बालपणातच मिळाली त्यामुळे सामाजिक सुधारण ोची व सामान्य लोकांसाठी झिजण्याची तळमळ त्यांच्या अंगी होती. वसंतराव नाईक यांचा आपल्या समाजात चालत आलेल्या रुढी परंपरेवर व अंधश्रद्धेवर विश्वास नव्हता. आपल्या समाजाने देखील इतर समाजाप्रमाणे जीवन जगावे अंधश्रद्धा, रुढी, परंपरा सोडाव्यात त्यासाठी त्यांनी आपल्या समाजात अनेक सुधारणा घडवून आणल्या जनतेशी एकरुप होऊन जनसामान्यांचे जीवन उन्नत होईल असे लोकोपयोगी सुधारणात्मक कार्ये केले ते पुढीलप्रमाणे आहेत.

**Keywords :**

ग्राम सुधारणा :
वसंतराव नाईक यांचा जन्म 'यवतमाळ' जिल्हयातील 'पुसद' तालुक्यातील 'गहुली' या मागासलेल्या खेडेगावी झाला. त्यांनी खेडयातील जीवन जवळून अनुभवले होते. खेडयातील अडी अडचणी व समस्यांची जाणीव त्यांना होती. त्यामुळे खेडयांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी 'ग्राम सुधारणा' कार्यक्रम सुरु केला. या कार्यक्रमांतर्गत अनेक आदर्श योजना राबवून अत्यंत अल्पावधीत गहुली हे गाव आदर्श करुन दाखवले.2 या गावाबरोबरच गहुलीच्या आसपासची 12 गावे सुधारणेच्या कार्यक्रमात निवडली. या गावातील पूर्वीची वेडीवाकडी वसाहत प्रमाणबद्ध बसवली. गावातले रस्ते रेखीव केले, तालुक्याशी ही गावे पक्क्या रस्त्याने जोडली, या गावात साक्षरतेची मोहीम राबवली, ज्या ठिकाणी शाळा नाहीत त्या ठिकाणी शाळा सुरु केल्या.

बंजारा समाजातील स्त्रियांच्या पोशाखात बदल :
पूर्वीचा बंजारा समाज म्हणजे रानामाळात तांडा करुन राहणारा समाज. या समाजातील स्त्रिया परंपरेनुसार चालत आलेला लेहंगा पद्धतीचा पेहराव वापरत. यामध्ये फेटिया, काचळी, अंटी–चोटला जो की वजनदार असल्यामुळे स्त्रियांना तो दररोज बदलणे शक्य नव्हते ते आरोग्याच्या दृष्टीने घातक होते. यामुळे वसंतराव नाईक यांनी आपल्या जातीतील या रुढींविरुद्ध आवाज उठवला. या स्त्रियांना महाराष्ट्रीय पद्धतीचा नववारी साडी–चोळी हा पोशाख वापरण्यास प्रवृत्त केले. या बदलाची सुरुवात वसंतरावांनी स्वतःच्या घरापासून केली.

दारुबंदीच्या कार्याचा शुभारंभ :
बंजारा समाजाला ज्या घातक प्रवृत्तीने ग्रासले होते त्यापैकी एक म्हणजे मद्यपान होय. समाजातील दारिद्रयाचे मुख्य कारण म्हणजे दारु त्यामुळे वसंतराव नाईक यांनी दारुबंदीच्या कार्याला सुरुवात केली. त्यामुळे कित्येक उद्ध्वस्त संसार उभे राहिले. वसंतराव नाईक यांनी जी गोष्ट कायद्याने होत नाही ती गोष्ट आपल्या त्यागाने, कर्तबगारीने आणि लोकांच्या ठायी विश्वास, आदरभाव, प्रेम उत्पन्न केल्यास शक्य होऊ शकते हेच दाखवून दिले.

महिला परिषदांचे आयोजन :
''घरातील माणूस शिकतो तेव्हा घरात तो एकटाच शिकलेला असतो, पण घरातली स्त्री शिकलेली असते तेव्हा सारे घर शिकते.''3

हे वसंतराव नाईक यांनी हेरले होते. त्यामुळे वसंतराव नाईक यांनी स्त्री शिक्षणावर भर दिला होता. यासाठी समाजातील संपूर्ण महिलांना एकत्र बोलावून उपदेश देण्यास सुरुवात केली होती. वसंतराव नाईकाने बंजारा समाजातील महिलांची गहुली ता. पुसद, जिल्हा यवतमाळ या ठिकाणी 1937 रोजी महिला परिषद बोलावली. या परिषदेत अनेक तांडयांतून बंजारा समाजाच्या महिला हजर राहिल्या या परिषदेस वसंतराव नाईक यांनी बंजारा भाषेत स्त्रियांना मार्गदर्शन केले.

अस्पृश्यता निवारण :
वसंतराव नाईकांनी प्रत्येक समाजाशी आपले संबंध जिव्हाळयाचे ठेवले, ते कोणत्याही जातीविषयी भेदभाव मानत नसत. त्यांना प्रत्येक माणूस हा सारखाच वाटे काही लोक माणसा–माणसात फरक करीत असत तेव्हा त्यांना चिड येई. याविषयी त्यांचे मत स्पष्ट होते.

''माणूस हा सर्वप्रथम माणूस राहिला पाहिजे, त्याला जातीच्या नावाखाली कमी लेखके यासारखा असंस्कृतपणा दुसरा कोणताही नाही.''4

राष्ट्रीय ऐक्य :
देशातील प्रत्येक माणूस हा आपुलकीच्या स्नेहाच्या भावनेने एका धाग्यात बांधला गेला पाहिजे. त्यातून देशाच्या राष्ट्रीय ऐक्याचे दर्शन झाले पाहिजे असे वाटत होते. यासाठी ते सतत प्रयत्नशील राहत ते एके ठिकाणी म्हणतात की, ''काश्मिरपासून कन्याकुमारीपर्यंत सारा देश माझा व मी देशाचा आहे ही आपली भावना नव्हे निष्टा बनली पाहिजे.''5 यासाठी आपण सर्वांनी एकजूट केली पाहिजे. यातूनच राष्ट्रीय ऐक्याची शक्ती वाढत असते.

भूदान चळवळीमधील योगदान :
आचार्य विनोबा भावे यांच्या मते, ''स्वेच्छेने भूमीचे दान करणे म्हणजे भूदान होय.''6 विनोबा भावेंनी सुरु केलेली भूदानाची चळवळ वसंतराव नाईक यांच्या मनावर फार मोठा प्रभाव पाडून गेली. ''भूदान त्यांना शांततामय मार्गाने होणारी क्रांती वाटली.''7 त्यामुळे वसंतराव नाईकांनी विनोबा भावे यांच्या कार्याची प्रेरण घेऊन समाजातील भूमीहीन वर्गासाठी कार्य केले. या कार्याची सुरुवात स्वतःच्या हिश्यातील जमिनीतून सहावा हिस्सा जमीन भूदानासाठी देवून केली.

गोरगरिबांची दुःखे जाणणारा व कृतीप्रवण राजकारणी :
वसंतराव नाईक यांच्या रक्तातच समाजकार्य ठासून भरलेले आहे. जनसंपक्र वाढवणे हा त्यांचा विद्यार्थीदशेपासूनचाच छंद होता. वसंतरावांना जनसंपर्काचा कंटाळा कधीच येत नव्हता. उलट जनसंपर्कामुळे जनतेचे प्रश्न समजावून घेण्यासाठी जी संधी मिळते त्यातच ते समाधानी असायचे. वसंतराव नाईक मुख्यमंत्री होते. त्यावेळी महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेसाठी त्यांचा दरबार कधीही खुला असायचा. ते सतत कार्यात मग्न राहायचे, यावरून असे दिसून येते की, वसंतराव नाईक गोरगरिबांची दुःखे ही स्वतःचे दुःखे मानत, ते कमी करण्यासाठी त्यांनी वेळोवेळी प्रयत्न केले. या कार्यात त्यांनी कधीही परकेपणाची भावना जानवू दिली नाही. कधी आळस केला नाही. ते म्हणतात, ''जिवात जीव आहे तोपर्यंत जनतेची सेवा करीन हाच मी माझा धर्म मानलेला आहे.''

परोपकाराची जान असलेला नेता :
आपल्या कर्तृत्वाने आगळे वेगळे व्यक्तीमत्व म्हणून नावारुपाला आलेल्या अनेक व्यक्तींपैकी वसंतराव नाईक हे एक होय. यशवंतराव चव्हाणांनी वसंतराव नाईक यांच्या अंगी असलेल्या स्वतंत्र विचारसरणी ठाम व कणखर भूमिका घेण्याची व्यवहारी वृत्ती व लोकाभिमुख ध ोरण कर्तबगार, मुत्सद्दी शिकारी व तडफदारपणा या गुणांची जाणीव होती. त्यामुळे त्यांनी उभरत्या महाराष्ट्राची सूत्र वसंतरावांच्या हाती सोपवली होती. वसंतरावांनी ही ते काम यशस्वीरित्या पार पाडले. वसंतराव नाईक म्हणतात, ''मला घडविण्यामध्ये माझ्या आई–वडिलांचा, माझ्या भावांचा व जनतेचा जेवढा वाटा आहे, तेवढाच यशवंतरावजी आपलाही आहे.''8

कुटुंब नियोजन :
भारत हा लोकसंख्येच्या बाबतीत जगातील दुसऱ्या क्रमांकाचा देश आहे. 1920–21

च्या नंतर भारताच्या लोकसंख्येत झपाटयाने वाढ होत गेली. वसंतराव नाईक 1963 रोजी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी विराजमान झाले. त्यावेळी महाराष्ट्रात दुष्काळ पडला होता. त्यावेळी अन्नधान्य उत्पादन घटले होते. लोकसंख्या भरमसाट वाढली होती. त्यामुळे अन्नधान्याची कमतरता जानवू लागली. त्यावेळी वसंतराव नाईकांनी आपल्या विचारांतून कुटुंबनियोजनासारखे विचार मांडले ते म्हणतात, ''संरक्षण आघाडी आणि अन्न आघाडी सांभाळण्यासाठी आपण जशी प्रयत्नांची पराकाष्टा करीत आहोत, त्याचप्रमाणे कुटुंबनियोजनाच्या आघाडीकडेही आपण तितकेच लक्ष देणे आवश्यक आहे. म्हणून प्रत्येक नागरीकाने राष्ट्रीय कार्य म्हणून कुटुंबनियोजनाचा अवलंब केला पाहिजे.''9

सारांश :

वसंतराव नाईक हे खरेखुरे समाजसुधारक कुशल प्रशासक आणि नैतिक मूल्यांची जोपासना करणारे व लोककल्याणकारी लोकप्रतिनिधी होते. त्यामुळे वसंतराव नाईकसाहेबांचे सामाजिक क्षेत्रातील योगदान संपूर्ण महाराष्ट्राला ज्ञात आहे.

निष्कर्ष :

1. दऱ्या खोऱ्यात राहणाऱ्या मागास बंजारा समाजातील अनिष्ठ रुढी परंपरेचे उच्च. ाटन करुन या समाजात परिवर्तन घडवून आणण्याचे काम वसंतराव नाईकांनी केले. म्हणूनच आज हा समाज विकासाच्या दिशेने वाटचाल करत असल्याचे दिसून येते.
2. बंजारा समाजाला ज्या घातक प्रवृत्तीने ग्रासले होते. त्यापैकी एक म्हणजे मद्यपान होय. समाजातील दारिद्रयाचे मुख्य कारण म्हणजे दारु त्यामुळे वसंतराव नाईक. ांनी जी गोष्ट कायद्याने होत नाही ती गोष्ट आपल्या त्यागाने, कर्तबगारीने आणि लोकांच्या ठायी विश्वास, आदरभाव उत्पन्न केल्यास शक्य होऊ शकते हे दाखवून दिले.
3. वसंतराव नाईक मुख्यमंत्री होते तेव्हा लोक समस्या घेवून रात्री अपरात्री त्यांच्याकडे येत असत तेव्हा वसंतराव नाईक यांना त्याचा त्रास कधी वाटला नाही. कारण ते गोरगरीबांची दुःखे ही स्वतःचे मानत ते कमी करण्यासाठी त्यांनी वेळोवेळी प्रयत्न केलेले दिसतात.
4. वसंतराव नाईक हे सामाजिक कार्य करताना नवीन बदल करताना त्या कार्याची सुरुवात स्वतःपासून करत असल्याचे दिसते.
5. महाराष्ट्रातील खेडी सुधारल्याशिवाय महाराष्ट्र सुधारणार नाही याची जाणीव वसंत. राव नाईक यांना होती त्यामुळे वसंतराव नाईक यांनी ग्राम सुधारणा कार्यक्रम हाती घेतला होता.

शिफारशी :

1. वसंतराव नाईक यांनी दऱ्या खोऱ्यात राहणाऱ्या मागासलेल्या लोकांसाठी सुरु केलेली परिवर्तनाची चळवळ त्यांच्या मरणोत्तर थंडावलेली दिसते. कारण आज देखील रानावनात राहणारे आदिवासी लोक परंपरागत जीवनच जगत असल्याचे दिसते. त्यामुळे महाराष्ट्र शासनाने वसंतराव नाईक यांनी सुरु केलेली परिवर्तनाची चळवळ गतिशील करण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.
2. व्यक्तीच्या दारिद्रयात भर टाकणारे व्यसनाधिनता हे एक कारण आहे हे ओळखून वसंतराव नाईक यांनी जी गोष्ट कायद्याने होत नाही ती गोष्ट आपल्या त्यागाने दारु निर्मिती बंद करुन दारुपिण्याचे हानीकारक परिणाम सांगून लोकांच्या ठायी विश्वास, आदरभाव, उत्पन्न करुन दाखवली. त्यामुळे महाराष्ट्र शासनाने दारु निर्मिती करणाऱ्या कारखान्याचे परवाने रद्द केले पाहिजेत.
3. वसंतराव नाईक यांनी समाजातील भेदभाव नष्ट करुन राष्ट्रीय ऐक्य निर्माण करण्याचे प्रयत्न केले. परंतु आज काही नेते असे आहेत की, ते राजकीय हेतू साधण्यासाठी धर्माधर्मात द्वंद्व निर्माण करतात त्यामुळे भारत सरकारने याकडे दूर्लक्ष करुन चालण ार नाही. राष्ट्रीय ऐक्य टिकवण्यासाठी जातीभेद नष्टकरुन स्पृश्य–अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी समाजसुधारकांच्या विचारांना प्रोत्साहन दिले पाहिजे व जातीय दंगली पेटवणाऱ्या समाजकंटकाला कायद्याच्या चौकटीत घेऊन धडा शिकविला पाहिजे.

REFERENCES

1. पाटील पंढरीनाथ – ''सामान्यातील असामान्य–वसंतराव नाईक'', प्रकाशक सौ. आशादेवी पंढरीनाथ पाटील, सहकारी वसाहत बांद्रा (पूर्व) मुंबई, 1975, पृ. 15. 2. बैस रामबिहारी सिंग–'वसंतराव नाईक जीवन–चरित्र', अभिजात प्रकाशन, खामला, नागपूर, 1987, 4. राठोड राजाराम – 'हिरवी क्षितिजे', शिवपार्वती कल्पना मुद्रणालय, पुणे, 1973, पृ. 62. 5. मिश्रा जयप्रकाश – 'कृषि अर्थशास्त्र', साहित्य भवन पब्लिकेशन, आगरा, पृ. 185. 6. राठोड राजाराम – 'हिरवी क्षितिजे', शिवपार्वती कल्पना मुद्रणालय, पुणे, 1973, पृ. 10.

Volume : 1 | Issue : 3 | March 2012 ISSN - 2250-1991

Research Paper Economics

# 2 वसंतराव नाईक यांचे आर्थिक क्षेत्रातील योगदान

* Dr. Ashok Pawar ** Mr. Atmaram mulik ***Dr. Sunita Rathod

*,**,*** Department of Economics, Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University Aurangabad

## ABSTRACT

वसंतराव नाईक यांनी आपल्या जीवन काळामध्ये महाराष्ट्राच्या आर्थिक विकासासाठी खूप मोठे योगदान दिलेले आहे. महाराष्ट्रातील यवतमाळ जिल्हयातील पूसद तालुक्यातील 'गहुली' या गावी बंजारा समाजातील एका शेतकरी कुटुंबात आई 'होनूबाई' व पिता 'फुलसिंग' नाईक यांच्या पोटी वसंतराव नाईक यांचा जन्म 1 जुलै 1913 रोजी झाला.1 हा दिवस कृषी दिन म्हणून साजरा केला जातो. मागासवर्गीय व दुर्लक्षित राहिलेल्या भटक्या बंजारा जातीत जन्माला आलेले 'वसंतराव नाईक' हे 'पुसद' नगरपालिकेचे आदर्श नगराध्यक्ष, 'जुन्या मध्यप्रदेशचे' महसूल खात्याचे उपमंत्री स्वातंत्र्य महाराष्ट्राचे सहकारमंत्री, कृषी मंत्री, महसूल मंत्री याशिवाय ''सर्वात लॉग इनिंग्जचे मुख्यमंत्री म्हणून काम पाहिले.''2 परंतु या पदावरुन काम करत असताना ते मातीला कधीही विसरले नव्हते. त्यांच्या मनाला ध्यासच जडला होता की, महाराष्ट्रातील मातीच्या कणा कणात समृद्धी फुलवण्याचा, कृषीवर आधारीत महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा वृद्धीदर वृद्धिंगत करण्याचा बहुसंख्येने शेतीवर आधारीत असलेला समाज सुधारण्याचा त्याचसाठी वसंतराव नाईक यांनी हरितक्रांतीचा कार्यक्रम जिद्दीने पुढे रेटला. दोन वर्षात महाराष्ट्र अन्नधान्यात स्वयंपूर्ण केला. वसंतराव नाईक यांचे महाराष्ट्राच्या आर्थिक क्षेत्रातील योगदान जाणून घेण्याच्या उद्देशाने ''वसंतराव नाईक यांचे आर्थिक क्षेत्रातील योगदान.'' हा विषय प्रस्तुत शोध निबंधासाठी निवडलेला आहे.

प्रस्तुत शोधनिबंध हा प्रामुख्याने दुय्यम सामुग्रीवर आधारीत आहे.

महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत प्रगतीमध्ये वसंतराव नाईक यांचे योगदान अत्यंत मोलाचे ठरलेले आहे. महाराष्ट्राची शेती, उद्योग, सहकार इ. क्षेत्रात त्यांनी मौलिक कार्य केलेली आहेत. या कार्यातून त्यांचे महाराष्ट्राच्या विकासातील आर्थिक योगदान दिसून येते.

Keywords :

कृषी क्षेत्रातील योगदान :

महाराष्ट्राच्या कृषि क्षेत्रामध्ये जेव्हा–जेव्हा समस्या निर्माण होतात त्यावेळी महाराष्ट्राला कै. वसंतराव नाईक यांची आठवण येते. माणूस व माणुसकी हे केंद्रबिंदू ठरवूनच त्यांनी राजकारण केले. ते नुसतेच राजकारणी नव्हते तर समर्थ शासक, प्रेमळ मित्र व सच्चा मार्गदर्शक, दिलदार मनाचे, सौजन्यशील सुसंस्कृत स्वभावाचे तळमळीचे समाजसेवक होते आणि त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे ते हाडाचे शेतकरी होते. शेती क्षेत्रातील त्यांचे योगदान खरोखरच प्रत्येक सुशिक्षित माणसांसमोर एक आदर्श म्हणून राहणार आहे. म्हणूनच वसंतराव नाईकांना सर्व जनता ''महाराष्ट्राच्या हरित क्रांतीचे जनक'' म्हणून ओळखते. पिढयान्पिढया पारंपरिक पद्धतीने चालत आलेल्या शेती व्यवसायाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्याचे काम वसंतराव नाईकांनी कृषीमंत्री असतानाच सुरु केले आणि यामुळे एक प्रकारे शेतकऱ्यांना कृषी संजीवनी मिळाली.

''आपल्या देशातील दारिद्रय आणि अन्नधान्याची टंचाई याविरुद्ध लढा देण्याची गुरुकिल्ली 'शेती' आहे. ज्या देशाला शांततेने जगायचे आहे आणि स्वाभिमानाने कोणत्याही गटात सामील न होण्याचे धोरण अवलंबवण्याचे आहेत. त्याला आपल्या भूमिवरच आपल्या देशातील जनतेस लागणारे अन्न पिकवावे लागणार आहे.''3

''शेतकऱ्यांला पाणी मिळाले की, तो चमत्कार करुन दाखवितो.''4 हा वसंतराव नाईक यांचा आवडता सिद्धांत होता. त्या दृष्टीने खेडया–पाडयातील छोटे–छोटे ओढे, नाले, गावतळी यातील पाणी छोटे–मोठे बंधारे घालून अडविले पाहिजे असे ते म्हणत. त्यासाठी पद्धतशीर योजना आखून त्यांनी त्यांची अंमलबजावणी केली. त्या छोटया बंधाऱ्यांना 'तगाई' मिळवून देण्याची व्यवस्था केली. आज ते बंधारे वसंत बंधारे, कोल्हापूरी बंधारे या नावाने सर्वत्र प्रसिद्ध पावले आहेत. ''आपल्या अर्थव्यवस्थेचा पाया शेती हा असल्याने ती अधिकात अधिक प्रगत झाली पाहिजे.''5 हे त्यांच्या भाषणाचे सूत्र होते.

''जमीन पाटाच्या पाण्याने भिजवा, ते जमत नसेल तर डोक्यावरुन पाणी आणा आणि तेही जमत नसेल तर घामाने जमीन भिजवा पण जमीन ओलीत करा.''6 असा कळकळीचा आणि तळमळीचा कल्पनाविलास वसंतराव नाईकांच्या ध्येयवादात आपल्याला दिसून येतो.

वसंतराव नाईक म्हणतात, ''शेतीत राबण्यासारखे दुसरे सुख नाही आणि पेरलेले शेत पिकाने बहरले की, पहायला त्यापेक्षा जगात दुसरे अनुपम सौंदर्य नाही.'' 7 यावरुन वसंतराव नाईकांना शेती व शेतकऱ्यांबद्दल अतोनात प्रेम होते हे आपल्याला दिसून येते. 1962 ला चीनने भारतावर आक्रमण केले तेव्हा तत्कालीन पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरु मनाने खूप खचले त्यावेळी वसंतराव नाईकांनी एकसूत्र सर्वांना सांगितले. ''युद्ध काळात रक्त सांडावयाचे नसेल तर शांततेच्या काळात घाम गाळावा लागेल.'''8 त्यातून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना उत्पादन वाढविण्याचे आव्हान केले. शेतीमध्ये आपण स्वयंपूर्ण झालो तर अन्नधान्यासाठी परदेशाकडे जावे लागणार नाही. तो पैसा आपण स्वसंरक्षणासाठी वापरु शकू. यासाठी ही लढाई हिमालयाच्या सरहद्दीवर आहे, तेवढीच ती शेताशेतामधून लढावयाची आहे. दोन मिनिटांच्या लहानशा भाषणात सुद्धा ते शेतीविषयक नवे प्रयोग या संदर्भात जनतेला सांगत. ''शेतकऱ्याच्या मालाला वाजवी किंमत मिळाली पाहिजे इतकेच नव्हे तर अन्नधान्याचा व्यवहार आपण व्यापारी लोकांच्या हातात ठेवला ही घोडचूक झाली.'' असे ते म्हणत.9

अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्णता आणण्यासाठी वसंतराव नाईकाने अतोनात प्रयत्न केले. 1965 ला वसंतराव नाईकांनी पुण्यात आपल्या भाषणात जाहीर घोषणा केली की, ''दोन वर्षात महाराष्ट्र अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण केला नाही तर मला जाहीररित्या फाशी द्या.''10 असे आत्मविश्वासाने सांगणारे उद्गार नाईकांनी प्रचंड सभेत काढले होते. प्रयत्नांची पराकाष्ठा करुन त्यांनी महाराष्ट्र अन्नधान्यात स्वयंपूर्ण खरे करुन दाखविल.

''शेतीचा धंदा पवित्र असून शेतकरी प्रत्यक्ष परमेश्वरच आहे. त्याची प्रतिष्ठा वाढविण्यातच राष्ट्राची प्रतिष्ठा वाढणार आहे.''11 हा एवढा मोठा विचार वसंतराव नाईकांनी देशाला दिलेला आहे. यावरुन आपल्याला वसंतराव नाईकांच्या मनात शेतकऱ्यांविषयी किती आदर होता हे कळून येते. शेतकरी हा देशाचा आधारस्तंभ आहे असे सर्वजन मानतात पण तो समस्यांनी पंगु झाला आहे याची खंत कुणालाच वाटत नाही. ही खंत वसंतराव नाईकांना वाटली. आज महाराष्ट्र शासनाचे आर्थिक परिस्थिती चांगली असूनही महाराष्ट्रात हजारो शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या याकडे शासन कानाडोळा करण्याचा प्रयत्न करते पण यामागे कोणती कारणे आहेत हे शोधण्याचा प्रयत्न करीत नाही. 1970 पर्यंत कापसाच्या बाबतीत दलालामार्फत शेतकऱ्यांची लूट व्हायची, शेतकऱ्यांना त्यांचा योग्य तो मोबदला मिळत नव्हता, यामुळे स्वतः वसंतराव नाईकांनी याबाबत लक्ष दिले आणि कापूस एकाधिकार खरेदी योजना लागू केली. ही योजना महाराष्ट्रात 1971 पासून आजतागायत चालू आहे. या योजनेमुळे शासन कापसाला हमीभाव जाहीर करीत असते, यामुळे शेतकऱ्यांची पिळवणूक थांबते. वसंतराव नाईकांच्या काळात अनेक ठिकाणी मुख्यमंत्री असताना महाराष्ट्रातील दुध समस्या सोडविण्याच्या दृष्टीने गंभीरपणे विचार केला गेला. संकरीत गायीच्या दुधाने महाराष्ट्रातील व देशातील दुधाचा प्रश्न सोडविता येईल ही दुरदृष्टी वसंतराव नाईकांना होती.

1972–73 मध्ये महाराष्ट्राला भयानक अशा दुष्काळी परिस्थितीतून जावे लागले. दुष्काळाने जनतेला ग्रासले होते. शेतकऱ्यांना अन्नासाठी वणवण हिंडावे लागत होते. शेतकरी पूर्णतः हताश झाला होता. यातून मार्ग काढण्यासाठी वसंतराव नाईकांनी 'रोजगार हमी योजना' चालू करण्याचा निर्णय घेतला. ''समाजातील मागासलेल्या वर्गाचा जर विकास करायचा असेल तर त्यांना रोजगार पुरवून त्यांचे दारिद्रय कमी केले पाहिजे. सर्वात जास्त मागास स्थितीत असलेल्या रोजगार पुरविणे हा आपल्या व्यापक विकास योजनेचा आवश्यक भाग असला पाहिजे''12 हा एक अत्यंत मूलभूत विचार भारतीय ग्रामीण अर्थशास्त्रात वसंतराव नाईकांनी मांडला.

उद्योगातील योगदान13 :

वसंतराव नाईक यांनी वेगवेगळया ठिकाणी केलेल्या भाषणावरुन त्याचे उद्योगासंबंधीचे योगदान दिसून येते.

वसंतराव नाईक यांनी महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाच्या प्रगतीसाठी कृषि विकासाबरोबरच उद्योगाच्या विकासाला अग्रक्रम देऊन प्रोत्साहन दिले. त्यासाठी विविध योजना आखून कार्यान्वित केल्या. त्यातून उद्योजक आकर्षित झाले व महाराष्ट्र राज्याची औद्योगिक प्रगती गतिमान झाली. त्यांच्या मते, ''औद्योगिकरणाला प्रोत्साहन देण्यासाठी उत्तम तांत्रिक लोक उपलब्ध असले पाहिजेत कारखानदाराचे ही आपल्या कर्मचाऱ्यांवर प्रेम असले पाहिजे. दोघांचाही उद्देश देशाचे उत्पादन वाढविण्याचा असला पाहिजे. परकीय उद्योगपतींना प्रोत्साहन देणे आणि औद्योगिकरणाला अनुकूल वातावरण करणे ही गोष्ट देशाच्या दृष्टीने अनुकूल आहे.'' असे वसंतराव आपल्या भाषणातून सांगतात.

औद्योगिक क्षेत्र हे राष्ट्राच्या विकासासाठी आवश्यक आहे. परंतु एकाच ठिकाणी अधिकाधिक औद्योगिकीकरण न वाढविता कच्चामाल उपलब्ध असलेल्या ठिकाणी त्याचे विकेंद्रिकरण झाले पाहिजे, या विकेंद्रीकरणावरच औद्योगिक प्रगतीचे यश अवलंबून राहील व समतोल विकास होण्यास मदत होईल. या कारखानदाराचा असा काही विशिष्ट वर्ग राहू शकत नाही. आज जे कारखानदार आहेत ते पूर्वी कारखानदार होते असे नाही. नवीन कारखानदार निर्माण करण्याची आज खरी गरज आहे. तरुणांनी नोकरीच्या शोधाला न लागता स्वतःच्या पायावर स्वतःचे उद्योग उभारावेत. परकीय चलन मिळवण्यासाठी निर्यातीवर भर दिला पाहिजे. संपत्ती पडून न ठेवता गुंतवणूक करण्यावर वसंतराव नाईकांचा भर होता असे दिसते.

सहकार क्षेत्रातील योगदान14 :

वसंतराव नाईक हे महाराष्ट्राचे पहिले सहकारमंत्री होते त्यामुळे सहकाराचे महत्त्व त्यांनी जाणले होते. देशात समाजवादी समाजव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी सहकार हा एक मार्ग आहे. त्यासाठी सहकारी चळवळीला प्रोत्साहन दिले पाहिजे असे वसंतरावांना वाटत होते. सहकारामुळे शेतकऱ्यांना आपले पैसे उद्योगात गुंतविता येतात. ग्रामीण भागात जे प्रश्न निर्माण होतात ते सहकारामुळे सोडवता येतात. सहकारामुळे ग्रामीण व नागरी (शहरी) भागातील अंतर कमी होण्यास मदत होते. त्यामुळे शहर व खेडे यातील लोक समान पातळीवर येतील.

थोडक्यात, ''वसंतरावांच्या मते, शेती विकास आणि शेतकऱ्यांचे कल्याण यासाठी सहकारी तत्त्वाची जोड अपरिहार्य आहे.

वसंतराव नाईकांच्या काळात सहकारी चळवळीची पाळेमुळे ग्रामीण भागामध्ये खोलवर पोहोचली आहेत. खेडयातील पतपेढी, गृहनिर्माण संस्था किंवा या ना त्या मार्गाने सहकारी चळवळीशी संबंध येतो. औषधी व्यवसायातही या चळवळीने पदार्पण केले असून काही ठिकाणी सहकारी तत्त्वांवर अत्यंत माफक दरात लोकांना औषधोपचाराच्या सोयी पुरविण्यात येत आहेत असे दिसते.

स्मारोप :

वसंतराव नाईक यांचे आर्थिक क्षेत्रातील योगदान स्पष्ट करताना या शोधनिबंधात कृषि, उद्योग, सहकार, रोजगार हमी योजना, कापूस एकाधिकार योजना व इतर योजनांचा आढावा घेतला आहे. यावरुन वसंतराव नाईक यांचे योगदान महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाचा पाया आहे असे दिसून येते.

निष्कर्ष :

1. शेतकऱ्यांना आर्थिकदृष्टया मजबूत करण्यासाठी वसंतराव नाईक यांनी महाराष्ट्रात कृषि उत्पादन क्षेत्रात कृषि मालावर प्रक्रिया उद्योग व शेतीस पुरक उद्योग उभारण्यास भांडवलदारांना व शेतकऱ्यांना प्रोत्साहीत केले.
2. दलाल, मध्यस्था मार्फत शेतकऱ्यांचे होणारे शोषण रोखण्यासाठी वसंतराव नाईक यांनी 'एकाधिकार खरेदी योजना मोठया प्रमाणात राबविली'.
3. वसंतराव नाईकांनी महाराष्ट्रात हरितक्रांती घडवून अन्नधान्याच्या बाबतीत महाराष्ट्राला स्वयंपूर्ण केले.
4. वसंतराव नाईकांनी महाराष्ट्रात 1972 मध्ये दुष्काळग्रस्त स्थितीत 'रोजगार हमी योजना' सुरु करुन संपूर्ण महाराष्ट्रभर विविध कामे चालू केली.
5. राज्याचा विकास साधण्यासाठी वसंतराव नाईकांनी औद्योगिकीकरणाला प्रोत्साहन दिले. परंतु राज्याचा संतुलीत विकास झाला पाहिजे. त्यासाठी उद्योगाचे विकेंद्रीकरण करण्यावर भर दिल्याचे दिसते.
6. शासनाने प्रगतीचे एक साधन म्हणून सहकार चळवळीकडे पाहिले पाहिजे असे वसंतरावांना वाटत होते. त्यांच्या प्रेरणेमुळे महाराष्ट्र राज्यामध्ये सहकार चळवळ गतिशील झाल्याचे दिसते.

शिफारशी :

1. वसंतराव नाईक यांनी सुरु केलेली एकाधिकार खरेदी योजना महाराष्ट्र शासनाने स्वीकारली; परंतु सध्याचे शासनकर्ते या योजनेकडे दूर्लक्ष करुन ती योजना बंद करण्याच्या मनःस्थितीत आहेत. या योजनेच्या यंत्रणेतील उदासीनता, भ्रष्टाचार, दिरंगाई दूर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे व या योजनेचे उद्दिष्टे कसे साध्य करता येईल याकडे लक्ष दिले पाहिजे.

2. वसंतराव नाईक यांनी सुरु केलेली 'रोजगार हमी योजना' महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारतात राबवली जाते हे वसंतराव नाईक यांच्या निर्णयाचे यशच म्हणावे लागेल; परंतु अलिकडच्या काळात रोजगार हमी योजनेत भ्रष्टाचार उफाळला आहे ही योजना कागदोपत्री अधिक व वास्तवात कमी चालते त्यामुळे भारत सरकारने ही योजना वास्तवात आणण्यासाठी विश्वासू लोकांच्या हाती या योजनेची सूत्रे दिली पाहिजेत.

3. वसंतराव नाईकांच्या काळात महाराष्ट्रात जलसंधारण, मृदासंधारण, पाणी अडवा पाणी जिरवा, वसंत बंधारे इत्यादी सुविधा उपलब्ध करुन दिल्यामुळे हरितक्रांती होण्यास मदत झाली. अशाच प्रकारच्या योजना भारत सरकारने मोठया प्रमाणात राबवाव्यात.

## REFERENCES

1. राठोड राजाराम (संपादक) – 'हिरवी क्षितिजे', शिव पार्वती कल्पना, मुद्रणालय, पुणे, 1973, पृ. 1. 2. मेहेंदळे विश्वास – ''यशवंतराव ते विलासराव, अनुबंध प्रकाशन, पुणे, 2007, पृ. 102 3. वसंत विचार वैभव – स्मरणिका, 1989, पृ. 34. 4. मधु मंगेश कर्णिक – 'दुत पर्जन्याचा', वसंतराव नाईक कृषि संशोधन व ग्रामीण विकास प्रतिष्ठान, मुंबई, 1994, पृ. 47. 5. उपरोक्त, पृ. 48. 6. वसंत विचार वैभव – स्मरणिका, 1989, पृ. 34. 7. मधु मंगेश कर्णिक – 'दुत पर्जन्याचा', वसंतराव नाईक कृषि संशोधन व ग्रामीण विकास प्रतिष्ठान, मुंबई, 1994, पृ. 47. 8. उपरोक्त, पृ. 60. 9. रमेश वाघमारे – 'कृषि क्रांतीचे जनक', वसंतराव नाईक स्मरणिका – 1990, पृ. 35. 10. रुद्रवार उत्तम, धुमाळे पुंडलिक – 'महाराष्ट्राचे वसंत वैभव', हिराणी प्रकाशन, यवतमाळ, 1992, पृ. 109. 11. पंढरीनाथ पाटील 'सामान्यातील असामान्य– वसंतराव नाईक प्रकाशन, सौ. आशादेवी पंढरीनाथ पाटील सरकारी वसाहत, बांद्रा' (पूर्व), मुंबई 1975, पृ. 37. 12. राजाराम राठोड (संपादक) – 'वर्षा' प्रकाशन प्राचार्य वसंतराव नाईक महाविद्यालय, औरंगाबाद, 1980, पृ. 27. 13. वसंतराव नाईक – 'समृद्धीच्या वाटा', प्रकाशक महासंचालक माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई, 1975, पृ. 16–83. 14. वसंतराव नाईक – 'आवाहन', परिजात प्रकाशन, मुंबई 1971, पृ. 66–67.